# आयुष्य

आयुष्याच्या रिकाम्या पानावर, जो तो त्याच्या मर्यादित पानावर काही लिहीत असतो, सुरुवातीच्या वेड्यावाकड्या बाल रेघांपासून ते वयाच्या शेवटापर्यंत येणाऱ्या गंभीर अनुभवांनी हे पान भरलेले असते.

काहींचे पान सुंदर तर काहींच्या पानावर थोडी खाडाखोड असते, कुणाचा थोडा फाटका कागद असतो तर कुणाचा अगदी करकरीत प्रतीचा असतो, शेवटी नेटाने आपले पान पूर्ण करण्याला महत्व आहे. कधी कधी लिहून दमछाक होते, मग एखादा स्वल्पविराम, अर्धविराम घ्यावा, असेही प्रश्नचिन्ह आणि उद्गारवाचकांनी बरीचशी नक्षी होतंच असते, कधी एखाद्या ठिकाणी खटकलं तर चक्क पूर्णविराम देऊन नवीन परिच्छेद घेऊन पुढच्या ओळीं लिहाव्यात. बाकी म्हणी, वाक्यप्रचार, अलंकार, जोडशब्द, व्याकरण असे मित्र/मैत्रीण रुपी सहकारी तर असतातच आपले पान पूर्ण करायला... आपले लिहिलेले पान आपल्यालाच शेवटी न अडखळता वाचता आले यातच सगळे सार्थक आले, पिंपळ पानाप्रमाणे आपल्या मनात हे पान जीर्ण होईतो जो तो जपत असतो, जितके जीर्ण तितके जास्त कोरीव दिसते .... कसलेही प्रसंग जसे की दुःख, उत्तुंग यश, गैरसमज, कटुता, असे प्रसंग आले तरी आपले पान पूर्ण करण्यात योगदायी ठरलेले अलंकाररूपी मित्र/मैत्रीण यांना मात्र विसरू नये !!! क्षमा मागून किंवा देऊन किंवा काही अन्य निमित्ताने ती अर्धी वाक्ये पूर्ण करावीत, कारण दर दिवशी आपण एकेका ओळीने आपल्या पान संपण्याकडे वाटचाल करीतच असतो. शेवटच्या ओळीला हे सगळे सोबत असले म्हणजे झाले ...

स.पु.

www.saarthbodh.com

सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी